| MHBI170004362025 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.१०८/२०२५ मधील निशाणी क्र.१२ वर आदेश</u>**<br>रामेश्वर वि. अंगद व ईतर<br>(दिनांक १०/०२/२०२६) |
|---|---|

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल करण्यात आलेला असून त्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा वाटणी करुन मिळणे बाबत दाखल केलेला आहे परंतु दाव्यामध्ये अनावधाने वाद मिळकतीच्या चर्तुःसीमा नमूद करणे राहुन गेलेले असल्यामुळे प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे वाद मिळकतीच्या चर्तुःसीमा दाव्यामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

२. प्रतिवादी तर्फे त्याच अर्जावर हरकत घेवुन अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली आहे.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला, दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत अर्जाचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, दाव्यामध्ये वाद मिळकतीच्या चर्तुःसीमा नमूद केलेल्या दिसून येत नाहीत. दावा मिळकतीची अचूकपणे ओळख पटविण्यासाठी मिळकतीच्या चर्तुःसीमा नमूद करणे आवश्यक आहे. दावा मिळकतीच्या चर्तुःसीमा नमूद न केल्यास दाव्यातील वादातीत प्रश्न पुर्णपणे निकाली काढता येणार नाही. सबब, प्रस्तावित दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तावित करण्यास परवानगी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नूकसान होणार नाही. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तत अर्ज **(नि.क्र.१२)** मंजुर करण्यात येतो.

२. सदर आदेश दिनांकापासून १४ दिवसांच्या आत प्रस्तावित दुरुस्ती करावी.

३. दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.02.11 10:39:47 +0530

**दिनांक : १०/०२/२०२६.**

**( विष्णु द. गिते )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>वडवणी. |
| लघुलेखकाचे नाव | :- | राजेश आर. कुलकर्णी. |
| घोषित दिनांक | :- | १०/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १०/०२/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १०/०२/२०२६ |